क्रांतीवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्था, संचलित

# कला व वाणिज्य महाविद्यालय, दिंडोरी

उमराळे रोड, शासकीय आय.टी.आय. जवळ, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक-४२२२०२
फोन : (०२५५७) २२२४३५ Email : kvnnaikcollegedindori@gmail.com
Web : www.kvnacs.com

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न (आयडी नं.पीयु/एनएस/एसी/६७/२००१)
नॅक मुल्यांकन 'ब' श्रेणी



प्राचार्य
डॉ. संजय सानप
एम.ए. सेट, एम.फील., पीएच.डी. (इंग्रजी)

AISHE Code : C-41216

जा.क्र. दिनांक : 05/04/2021

## परीक्षा कक्ष महत्वाची सुचना

वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, ऑक्टो/नोव्हें. 2020 च्या सत्रातील परीक्षा एप्रिल/मे 2021 मध्ये होणार असल्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा कक्षाने परिपत्रक क्र.04/2021,05/2021 नुसार महाविद्यालयास कळवले आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाने या परीक्षा घेण्यासाठी खालील मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली आहे, याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

1) प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित, अनुशेषीत व रिपीटर (Regular/Backlog/Repeaters Subjects ) परीक्षांचे नियोजन ऑनलाइन पद्धतीने दिनांक 10 एप्रिल, 2021 पासुन करण्यात आले आहे. या परीक्षा फक्त ऑनलाइन प्रॉक्टर्ड बहुपर्यायी प्रश्नाद्वारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पद्धतीने घेण्यात येतील. ऑनलाइन प्रॉक्टर्ड पद्धतीने होणाऱ्या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या 50 गुणांच्या 60 मिनिटे (एक तास) कालावधीच्या राहतील. यासाठी 60 बहुपर्यायी प्रश्न (MCQ) दिले जातील त्यामधून 50 प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राह्य धरण्यात येतील.
2) सदर परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर टप्याटप्याने प्रसिद्ध करण्यात येत आहे.
3) प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित, अनुशेषीत व रिपीटर (Regular/Backlog/Repeaters) ऑनलाइन परीक्षांच्या बाबतीत विद्यार्थ्यांना एसएमएस व ई-मेलद्वारे अवगत करण्यात येईल . मात्र यासाठी विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे. परिक्षा फॉर्म भरताना दिलेला मोबाईल नंबर व ईमेल आयडी ग्राह्य धरला जाणार आहे.
4) Mock Test व Online Examination साठी विद्यापीठाकडून येणारा User ID व Password नोंदणीकृत मोबाईल / ईमेल वर न आल्यास http://sps.unipune.ac.in/sim-app/login/login या लिंकवर लॉगिन करावे. लॉगिन करण्यासाठी परीक्षा फॉर्म भरतांनाचा वापरलेला User ID व Password वापरावा. Mock Test / Online Exam देतांना येणारी अडचण या नोटीस मधील मुद्दा क्र. 10 नुसार Students Profile वर नोंदवावी.
5) ऑनलाइन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला संगणकीय प्रणालीतून वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडवलेली उत्तरे ही जतन (Save) होऊन खंड पडल्यास तेथून परीक्षा पुन्हा सुरू होईल. तसेच परीक्षेदरम्यान काही अडचणी आल्यास (020) 71530202 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करावा.
6) ऑनलाइन परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी परीक्षेमधील नमूना प्रश्नावर आधारीत सराव परीक्षांचे आयोजन (Mock Test) मुख्य परीक्षेपूर्वी दिनांक 5 एप्रिल, 2021 ते 9 एप्रिल 2021 सकाळी 10 ते दुपारी 3 पर्यन्त कालावधीत करण्यात येईल व तसे सर्व संबंधितांना अवगत करण्यात येईल.
7) दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी 20 मिनिटे अधिकचा वेळ देय राहील.

Scanned by CamScanner

8) प्रथम वर्ष ते अंतील वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित, अनुशेषीत व रिपीटर (Regular/Backlog/Repeaters) विषयांच्या ऑनलाइन पद्धतीने परीक्षा या परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र.4/2021 दि. 16 मार्च ,2021 रोजी प्रसिद्ध केल्याप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमावर होतील. तसेच आभियांत्रिकी 2015 पॅटर्नच्या प्रथम वर्षाच्या प्रथम सत्रातील अनुशेषीत विषयांच्या परीक्षा या 100 टक्के अभ्यासक्रमावर आधारित असतील .

9) गणित व संख्याशास्त्र अभ्यासक्रमातील विषयांच्या परीक्षा ऑनलाइन प्रॉक्टर्ड पद्धतीने होणाऱ्या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) पद्धतीने, 50 गुणांकरिता, 30 प्रश्न प्रत्येकी 2 गुणांसाठी या पद्धतीने विचारण्यात येतील. विद्यार्थ्यांनी दिलेली 25 प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राह्य धरण्यात येतील.

10) सर्व विद्यार्थ्यांना विषयात मिळालेले गुण (Online Score) हे परीक्षेनंतर 48 तासात Student Profile System मध्ये उपलब्ध करून देण्यात येतील. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पुढील 48 तासाच्या आत अडचणी व शंका असल्यास तक्रार तेथेच नोंदवावी, Student Profile System मध्ये नोंदविलेल्या तक्रारीचे ग्राह्य धरण्यात येतील व त्यानंतर कोणत्याही सबबीवर तक्रार स्वीकारली जाणार नाही.

11) प्रत्येक विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा पूर्ण केल्याची पोहोच (Acknowledgement) दिसेल सदर बाबीचा स्क्रीन शॉट/फोटो/प्रिंट विद्यार्थ्यांनी आपल्याकडे जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

12) सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी sppuexam.in या संकेतस्थळाचा वापर करावा. तसेच परीक्षांबाबत सूचना (In structions), उपयोगकर्ता पुस्तिका (User Manual) व व्हिडिओ (Videos) याच संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

मात्र परीक्षा फॉर्म भरताना सायबर कॅफे/इतरांचा ई-मेल आयडी व मोबाइल नं. विद्यार्थ्यांनी दिला असेल तर तो बदलून घ्यावा. नवीन मोबाईल नंबर व ईमेल बदलण्यासाठी http://sps.unipune.ac.in यावर लॉगिन करून Student Profile मध्ये नवीन मोबाईल नंबर व ईमेल आयडी अपडेट करून घ्यावा.

परीक्षा विषयक अपडेट माहिती घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत: आपल्या महाविद्यालयाच्या www.kvnacs.com ही वेबसाइट नियमित पहावी तसेच त्या त्या वर्गाच्या whatsapp Group वर येणाऱ्या सूचनांची नोंद घ्यावी.

अधिक महितीसाठी संपर्क –

झाल्टे सर – 9766166064,<br>
उगले सर – 9657467901,<br>
वडजे मॅडम – 8975175867

कळावे,

05/04/2021

College Examination Officer<br>
K.V.N. Naik Shikshan Sanstha's<br>
Arts and Commerce College,<br>
Dindori, Tal. Dindori, Dist. Nashik.

Principal<br>
K.V.N. Naik Shikshan Prasarak Sanstha's<br>
Arts and Commerce College,<br>
Dindori, Tal. Dindori, Dist. Nashik.

Scanned by CamScanner